
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

महापौर रवी लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी
(पान २ वर)



। गुरुवार, दि. २१ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४६ । पाने २। DIGITAL EDITION

Selected

## मुक्त विद्यापीठाच्या परीक्षेवर आता 'एआय'ची नजर

नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणालीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रायोगिक तत्त्वावर अवलंब करण्यात येणार आहे. विद्यापीठाची परीक्षा पारदर्शक, सुरक्षित व गैरप्रकारमुक्त वातावरणात व्हावी, यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार विद्यापीठ प्रशासनाकडून हा प्रयोग करण्यात येत आहे. बुधवारपासून विद्यापीठाच्या मे / जून २०२६ च्या मुख्य (उन्हाळी) परीक्षा सुरु होत आहेत. त्यासाठी महाराष्ट्रातील एकूण ५५८ परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका डाऊनलोडिंग कक्ष आणि उत्तरपत्रिका सिलिंग कक्ष अशा दोन्ही ठिकाणी एआय प्रणालीवर आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.

### जळगाव विधान परिषद निवडणुकीत महायुतीतच रस्सीखेच

# प्रताप पाटील यांना भाजपकडून ऑफरची चर्चा!

## उमेदवारीवरून भाजप-शिंदे गटात अंतर्गत संघर्ष तीव्र, राजकारणाला नवे वळण मिळण्याची शक्यता

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीमुळे जळगाव जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून महायुतीतील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर येऊ लागला आहे. उमेदवारीच्या मुद्द्यावरून भाजप आणि शिवसेना शिंदे गटामध्ये सुरू असलेल्या रस्सीखेचीदरम्यान आता एक नवी राजकीय चर्चा रंगू लागली आहे.**

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे पुत्र प्रताप पाटील यांना थेट भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याची ऑफर मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच महायुतीमधील जागावाटपाचा तिढा समोर आला आहे. जिल्ह्यात भाजप आणि शिंदे गट या दोन्ही पक्षांकडून या जागेवर दावा करण्यात येत असल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. आगामी काळातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची मानली



जात आहे. शिंदे गटाचे नेते तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी या जागेवर आपला ठाम दावा करत पुत्र प्रताप पाटील यांचे नाव पुढे केले आहे. प्रताप पाटील हे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य असून गेल्या काही वर्षांपासून ते स्थानिक राजकारणात सक्रिय आहेत. पालकमंत्र्यांच्या राजकीय प्रभावामुळे त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात असतानाच भाजपनेही ही जागा सोडण्यास नकार दिला आहे. जळगाव जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मजबूत संघटन उभारले आहे. महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींमध्ये भाजपचे मोठे संख्याबळ असल्याने ही जागा भाजपच्या वाट्याला यावी, अशी भूमिका पक्षातील वरिष्ठ नेत्यांकडून मांडली जात आहे. भाजपकडून अनेक इच्छुकांनी तयारी सुरू केली असून पक्षश्रेष्ठींकडे लॉबिंगलाही वेग आल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, गुलाबराव पाटील यांचा जिल्ह्यातील प्रभाव, संघटन क्षमता आणि महायुतीसाठी केलेले राजकीय योगदान लक्षात घेता ही जागा शिंदे गटालाच मिळावी, असा आग्रह कायम ठेवण्यात आला आहे. त्यामुळे महायुतीमध्येच अंतर्गत स्पर्धेचे चित्र निर्माण झाले आहे.या निवडणुकीतील गणितेही अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका अद्याप झालेल्या नसल्याने ६८ जिल्हा परिषद सदस्य आणि १५ पंचायत समिती सभापती मतदान प्रक्रियेत सहभागी होणार नाहीत. त्यामुळे आता संपूर्ण निवडणूक जळगाव महापालिका, जिल्ह्यातील १५ नगरपालिका आणि चार नगरपंचायतींतील निर्वाचित तसेच स्वीकृत सदस्यांभोवती केंद्रित झाली आहे. सुमारे ६३० नगरसेवकांच्या मतदानावर विधान परिषद सदस्याची निवड होणार असल्याने प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार आहे.

### निर्णयांकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले

भाजपची ऑफर स्वीकारली जाणार का, महायुतीत तडजोड होणार का, की मैत्रीपूर्ण लढत पाहायला मिळणार, याबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रकरणात अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार केवळ गुलाबराव पाटील यांच्याकडे नसून शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेच राहणार असल्याचे राजकीय सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे मुंबईतील बैठका, पक्षश्रेष्ठींच्या चर्चा आणि आगामी एक-दोन दिवसांत होणाऱ्या निर्णयांकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# "राज्यात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध"

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यातील पेट्रोल-डिझेल साठ्यावरून बुधवारी राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर मोठा संभ्रम निर्माण झाला. अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी "राज्यात केवळ एक महिना पुरेल इतकाच पेट्रोल-डिझेलचा साठा उपलब्ध आहे," असे वक्तव्य केल्यानंतर विविध जिल्ह्यांमध्ये नागरिकांकडून पेट्रोल पंपांवर गर्दी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढे येत जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "राज्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा नाही. पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये." जागतिक परिस्थिती अस्थिर असतानाही केंद्र आणि राज्य सरकारने इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यात यश मिळवले असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, छगन भुजबळ यांनीही केरोसीनचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे सांगत इंधन पुरवठा साखळी पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट केले. मात्र, त्यांच्या "एक महिन्याचा साठा" या विधानामुळे



विरोधकांनी सरकारवर टीका सुरू केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी या मुद्द्यावर सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी केली. राज्यात काही भागांमध्ये पेट्रोलपंपांवर अचानक वाहनांच्या रांगा लागल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

### इंधनाचा जपून वापर करावा

याबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "इंधन पुरवठ्याची साखळी वर्षानुवर्षे ठरावीक पद्धतीने चालते. मात्र अफवा पसरल्यानंतर नागरिकांकडून अचानक मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाते. त्यामुळे पुरवठा व्यवस्थेवर ताण येतो." त्यामुळे नागरिकांनी घाबरून अतिरिक्त इंधन खरेदी करू नये तसेच इंधनाचा जपून वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# जळगावात ऑनलाईन औषध विक्रीविरोधात एल्गार; 'तिरडी आंदोलनाने'वेधले लक्ष

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** ऑनलाईन औषध विक्रीच्या विरोधात जळगाव जिल्हा मेडिकल डीलर्स असोसिएशनच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात सहभागी झालेल्या केमिस्टांनी ऑनलाईन औषध विक्रीची प्रतीकात्मक 'तिरडी' काढून ई-कॉमर्स कंपन्यांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या अनोख्या आंदोलनाने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले असून, जिल्हाभरात या आंदोलनाची मोठी चर्चा रंगली आहे. मोर्चादरम्यान औषध विक्रेत्यांनी सरकार आणि संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्यासाठी तीव्र भूमिका घेत ऑनलाईन औषध विक्रीवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी केली. तसेच मागण्या तातडीने मान्य न झाल्यास भविष्यात आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

केमिस्ट संघटनेच्या म्हणण्यानुसार, कोरोना काळात नागरिकांच्या



सोयीसाठी सरकारने औषधांच्या होम डिलिव्हरीला तात्पुरती परवानगी दिली होती. मात्र ती मुदत संपल्यानंतरही अनेक ई-कॉमर्स कंपन्या बेकायदेशीरपणे ऑनलाईन औषध विक्री सुरू ठेवत आहेत. या विक्रीमुळे औषधांच्या नियमांचे उल्लंघन होत असून रुग्णांच्या आरोग्याशी गंभीर खेळ सुरू असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

विशेष म्हणजे, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनची योग्य पडताळणी न करता औषधे विकली जात असल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. संघटनेने यावेळी एक गंभीर मुद्दाही मांडला. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या मदतीने बनावट प्रिस्क्रिप्शन तयार करून औषधे मागवली जात असल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे प्रतिजैविके, झोपेच्या गोळ्या तसेच अंमली स्वरूपाच्या औषधांचा गैरवापर वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकारामुळे तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे वळू शकते, तसेच औषधांच्या चुकीच्या वापरामुळे आरोग्यविषयक गंभीर परिणाम उद्भवू शकतात, असे मतही आंदोलकांनी व्यक्त केले. ऑनलाईन विक्रीमुळे पारंपरिक मेडिकल व्यवसायावर मोठे आर्थिक संकट कोसळत असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.

# धुळे मनपा गैरव्यवहार प्रकरणाने खळबळ

## माजी आमदार अनिल गोटे यांची थेट पोलीस ठाण्यात तक्रार

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे महानगरपालिकेतील कथित ४५ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे शहराच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. माजी आमदार अनिल अण्णा गोटे यांनी स्वतः धुळे शहर पोलीस ठाण्यात उपस्थित राहत पुराव्यांसह रितसर तक्रार दाखल केल्याने या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. माजी आमदार अनिल गोटे यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, रिलायन्स, एअरटेल, व्होडाफोन यांसह विविध टेलिकॉम कंपन्यांकडून धुळे महानगरपालिकेच्या नावाने देण्यात




आलेले डिमांड ड्राफ्ट मनपाच्या अधिकृत खात्यात जमा न होता कथितरित्या खाजगी खात्यांमध्ये जमा करण्यात आले. या व्यवहारातून अंदाजे ४५ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीत धुळे महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त, तत्कालीन अधिकारी तसेच संबंधित कर्मचारी यांच्यावर आर्थिक अनियमितता आणि निधी गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही तक्रारीत करण्यात आली आहे. माजी आमदार अनिल गोटे यांनी पोलिसांकडे सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये विविध आर्थिक व्यवहारांचे तपशील आणि संबंधित पुरावे जोडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी कोणत्या दिशेने जाते याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या गंभीर आरोपांमुळे महानगरपालिकेच्या आर्थिक कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्येही संताप व्यक्त केला जात आहे. शहरातील विविध सामाजिक व राजकीय संघटनांकडून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणी होत आहे. या संदर्भात अँड. भूषण (बंटी) पाटील यांनी प्रसारमाध्यमांना माहिती देताना सांगितले की, संपूर्ण प्रकरणाचे पुरावे संबंधित यंत्रणांकडे सादर करण्यात आले.

# लाच घेताना उपनिबंधक एसीबीच्या जाळ्यात!

## खासगी इसमासह रंगेहात अटक

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** अवैध सावकारी प्रकरणातील चौकशी अहवाल अनुकूल पाठवून तक्रारदाराविरुद्ध गुन्हा दाखल होऊ नये यासाठी तब्बल पाच लाख रुपयांची लाच मागणाऱ्या जळगाव येथील उप निबंधक सह संस्था कार्यालयातील अधिकाऱ्याला अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. तडजोडीनंतर तीन लाख रुपयांवर व्यवहार ठरल्यानंतर पहिला हप्ता म्हणून दीड लाख रुपये खासगी इसमामार्फत स्वीकारताना एसीबीच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली. या घटनेमुळे जिल्ह्यातील सहकार विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील आरोपी जगदीश बाबुराव बारी (वय ५६, रा. शांतिनगर, यावल रोड, भुसावळ) हे उप निबंधक, सह संस्था, जळगाव येथे कार्यरत आहेत. तर देविदास धनसिंग पाटील (वय ४४, रा. भुरे मामलेदार प्लॉट, शिवाजीनगर, जळगाव) हे जळगाव जिल्हा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनचे मानद कार्यकारी अधिकारी असून त्यांनाही या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराविरुद्ध अवैध सावकारी व्यवसायासंदर्भात चौकशी सुरू होती. या प्रकरणाची सुनावणी उप निबंधक सहकारी संस्था, जळगाव तालुका कार्यालयात सुरू होती. चौकशी संदर्भात माहिती घेण्यासाठी तक्रारदार संबंधित कार्यालयात गेले असता, त्यांच्याविरुद्ध तसेच त्यांच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल होऊ नये आणि चौकशी अहवाल अनुकूल पाठविण्यासाठी उप निबंधक जगदीश बारी यांनी तब्बल पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या तक्रारदाराने १८ मे २०२६ रोजी जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे



तक्रार दाखल केली. त्यानंतर एसीबीने पंचासमक्ष पडताळणी केली असता लाच मागणीची खातरजमा झाली. पडताळणीदरम्यान आरोपी बारी यांनी पाच लाख रुपयांच्या मागणीवर तडजोड करत तीन लाख रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्यातील पहिला हप्ता म्हणून २० मे रोजी दीड लाख रुपये देविदास पाटील यांच्याकडे देण्यास सांगण्यात आले होते. ठरल्याप्रमाणे बुधवारी एसीबीच्या पथकाने जळगाव जिल्हा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन लिमिटेड, बी. जे. मार्केट, जळगाव येथील कार्यालयात सापळा रचला. तक्रारदाराकडून देविदास पाटील यांनी दीड लाख रुपयांची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

### पाच लाख रुपयांची मागणी

पडताळणीदरम्यान आरोपी बारी यांनी पाच लाख रुपयांच्या मागणीवर तडजोड करत तीन लाख रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्यातील पहिला हप्ता म्हणून २० मे रोजी दीड लाख रुपये देविदास पाटील यांच्याकडे देण्यास सांगण्यात आले होते. ठरल्याप्रमाणे बुधवारी एसीबीच्या पथकाने जळगाव जिल्हा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन लिमिटेड, बी. जे. मार्केट, जळगाव येथील कार्यालयात सापळा रचला.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# मालमत्ता विभागातील ढिसाळ कारभारावर माजी नगरसेवकांचा संताप

## नागरिकांची फरफट कधी थांबणार?"; धुळे मनपाच्या कामकाजावर शिरसाठ यांचा संतप्त सवाल

जन सम्राट टाईम्स

**धुळे :** मालमत्ता कर विभागातील रखडलेल्या कामांमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त असतानाच धुळे महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभाराचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. कार्यकर्त्याचे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेले मालमत्तेचे काम मार्गी लावण्यासाठी गेलेल्या माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांना दुपारच्या वेळेत कार्यालयात एकही कर्मचारी आढळून न आल्याने त्यांनी संताप व्यक्त करत थेट मालमत्ता कर अधीक्षकांनाच धारेवर धरले. मिळालेल्या माहितीनुसार, माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांच्या एका कार्यकर्त्याने नवीन घर खरेदी केल्यानंतर घरपट्टी



नावावर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह प्रतिज्ञापत्र मालमत्ता कर विभागात सादर केले होते. मात्र अनेक महिने उलटूनही काम पूर्ण होत नसल्याने संबंधित कार्यकर्त्याची वारंवार फरफट सुरू होती.

अखेर नागरिकांच्या या त्रासाला कंटाळून माजी नगरसेवक स्वतः विभागात पोहोचले. परंतु दुपारच्या सुमारास मालमत्ता कर विभागात गेल्यानंतर कार्यालयातील बहुतांश कर्मचारी अनुपस्थित असल्याचे दिसून आले. ऐन कामकाजाच्या वेळेत कर्मचारी गायब असल्याने संतप्त झालेल्या जितेंद्र शिरसाठ यांनी मनपा प्रशासनाच्या निष्क्रियतेवर जोरदार टीका केली. "सामान्य नागरिकांनी किती वेळा चकरा मारायच्या? अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयात नसतील तर नागरिकांची कामे कशी होणार?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.यावेळी त्यांनी मालमत्ता कर अधीक्षकांना थेट जाब विचारत विभागातील कामकाजात तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली.

नागरिकांच्या समस्या सोडवण्याऐवजी त्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, शासनाच्या नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत जेवणासाठी घरी जाऊ नये, असे स्पष्ट निर्देश असतानाही अनेक कर्मचारी दुपारी एक वाजल्यापासून सायंकाळी साडेचारपर्यंत कार्यालयात अनुपस्थित राहत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांची कामे रखडत असून मनपा प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. माजी नगरसेवकांच्या या आक्रमक भूमिकेनंतर तरी मालमत्ता कर विभागातील कामकाजात सुधारणा होणार का, की नागरिकांची फरफट अशीच सुरू राहणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मनपा प्रशासनाच्या निष्क्रियतेवर जोरदार टीका

अखेर नागरिकांच्या या त्रासाला कंटाळून माजी नगरसेवक स्वतः विभागात पोहोचले. परंतु दुपारच्या सुमारास मालमत्ता कर विभागात गेल्यानंतर कार्यालयातील बहुतांश कर्मचारी अनुपस्थित असल्याचे दिसून आले. ऐन कामकाजाच्या वेळेत कर्मचारी गायब असल्याने संतप्त झालेल्या जितेंद्र शिरसाठ यांनी मनपा प्रशासनाच्या निष्क्रियतेवर जोरदार टीका केली. "सामान्य नागरिकांनी किती वेळा चकरा मारायच्या? अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयात नसतील तर नागरिकांची कामे कशी होणार?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

✓ » Selected

### गोदावरी वाळू उपशाविरोधित महिला आक्रमक

**अहिल्यानगर:** :श्रीरामपूर तालुक्यातील रामपूर कोकरे परिसरातील गोदावरी नदीपात्रातील वाळूपट्ट्याच्या लिलावाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आक्रमक भूमिका घेतली. महिलांवर झालेल्या कथित दगडफेकीच्या घटनेनंतर रामपूर व नाऊर येथे आज, बुधवारी झालेल्या विशेष ग्रामसभांमध्ये संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या. महिलांनी वाळू उपशासाठी रस्ता होऊ देणार नाही, नदीपात्रातील वाळूचा एक खडादेखील उचलू देणार नाही, असा निर्धार व्यक्त केला. रामपूर येथील विशेष ग्रामसभेत महिलांनी आक्रमक भूमिका घेत वाळू उपसा व वाहतुकीला ठाम विरोध दर्शविला. परिसरातील शांतता, शेती व पाणीपुरवठा धोक्यात घालणाऱ्या वाळू उपशाविरोधात आता अहोरात्र जागता पहारा ठेवण्याचा निर्धार ग्रामसभेतून व्यक्त करण्यात आला. नंतर महिलांनी ट्रॅक्टरमधून नाऊर गावाकडे मोर्चा काढत तेथेही विशेष ग्रामसभा घेतली.

# ऑनलाइन औषध विक्रीविरोधात धुळ्यात मेडिकल दुकानदारांचा एल्गार!

## मेडिकल व्यावसायिक रस्त्यावर; निर्णय मागे न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** शासनाच्या ऑनलाइन औषध विक्री धोरणाविरोधात धुळे जिल्ह्यातील मेडिकल दुकानदार आक्रमक झाले असून आज एक दिवसीय बंद पाळत तीव्र आंदोलन करण्यात आले. जिल्ह्यातील सुमारे अडीच हजार मेडिकल दुकानदारांनी या संपात सहभागी होत आपली दुकाने बंद ठेवली. अखिल भारतीय औषधी विक्रेता संघाच्या देशव्यापी बंदच्या हाकेला प्रतिसाद देत धुळे जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघाच्या पदाधिकाऱ्यांनी काळ्या फिती लावून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत शासनाविरोधात संताप व्यक्त केला. आंदोलनादरम्यान मेडिकल व्यावसायिकांनी शासनाच्या ऑनलाइन औषध



विक्रीच्या निर्णयाचा निषेध करत "ऑनलाइन औषध विक्री बंद करा", "स्थानिक मेडिकल व्यवसाय वाचवा", "बनावट औषध विक्री रोखा" अशा घोषणा दिल्या. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. मेडिकल व्यावसायिकांनी सांगितले की, शासनाने ऑनलाइन औषध विक्रीला प्रोत्साहन दिल्यास स्थानिक मेडिकल दुकानदारांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. तसेच ऑनलाइन माध्यमातून बनावट आणि निकृष्ट दर्जाची औषधे ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा धोका वाढणार असल्याचा गंभीर आरोपही संघटनेने केला आहे. कंपन्यांकडून ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात दिल्या जाणाऱ्या सवलतींमुळे पारंपरिक मेडिकल व्यवसाय अडचणीत सापडत असल्याची खंत व्यावसायिकांनी व्यक्त केली. "आम्ही अनेक वेळा शासनातील मंत्री आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदने देऊन हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली. आंदोलनेही केली; मात्र शासनाने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अखेर देशव्यापी संपाचा मार्ग स्वीकारावा लागला," असे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून काही अत्यावश्यक मेडिकल दुकाने सुरू ठेवण्यास संघटनेकडून परवानगी देण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना औषधांचा तुटवडा भासू नये, यासाठी आवश्यक सेवा सुरू ठेवण्यात आल्याची माहिती संघटनेने दिली.

### निकृष्ट दर्जाची औषधे ग्राहकांपर्यंत

ऑनलाइन माध्यमातून निकृष्ट दर्जाची औषधे ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा धोका वाढणार असल्याचा गंभीर आरोपही संघटनेने केला आहे. कंपन्यांकडून ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर दिल्या जाणाऱ्या सवलतींमुळे मेडिकल व्यवसाय अडचणीत सापडत असल्याची खंत व्यावसायिकांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी | ज

# झाड कत्तलीविरोधात बेमुदत धरणे आंदोलन

## दोषींवर कठोर कारवाईची मागणी



जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी:** पुण्यातील मार्केटयार्ड परिसरात सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर झाड कत्तलीच्या विरोधात रिपब्लिकन आझाद सेना आक्रमक झाली असून, दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी संघटनेच्या वतीने बिबेवाडी क्षेत्रीय कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. पर्यावरण संवर्धनाच्या मुद्द्यावर संघटना रस्त्यावर उतरल्याने प्रशासनाचेही लक्ष या प्रकरणाकडे वेधले गेले आहे. मार्केटयार्ड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात काही झाडांच्या फांद्या कापण्यासह झाडांची कत्तल करण्यात येत असल्याचा आरोप रिपब्लिकन आझाद सेनेने केला आहे. गजबजलेल्या शहरी भागात पर्यावरणासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या झाडांची अशा प्रकारे तोड होत असल्याने नागरिकांमध्येही संतापाची भावना व्यक्त होत आहे. आंदोलनादरम्यान रिपब्लिकन आझाद सेनेच्या शिष्टमंडळाने बिबेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती शीतल वाकडे यांची भेट घेत संबंधित मागण्यांचे निवेदन सादर केले. झाडांची बेकायदेशीर तोड करणाऱ्यांची चौकशी करून संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करावेत, तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शहरातील वाढते प्रदूषण, उष्णतेची तीव्रता आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता झाडांचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे. मात्र काही घटकांकडून आर्थिक फायद्यासाठी झाडांची कत्तल केली जात असल्याचा आरोप करत त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे आंदोलन रिपब्लिकन आझाद सेनेचे संस्थापक अध्यक्ष अजय भाऊ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आंदोलनात पुणे शहराध्यक्ष दत्ता कांबळे, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा शीला उपाध्ये, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रवींद्र कुचेकर आणि पुणे जिल्हा कार्याध्यक्ष संजय खंडागळे यांनी प्रमुख सहभाग नोंदवला. याशिवाय हिरा कांबळे, संदीप चव्हाण, महादेव कांबळे, आकाश शिंदे, सचिन कदम, राहुल शेळके, नागेश शिंदे, भावेश कांबळे, रुपेश चव्हाण, आदित्य कांबळे, निलेश शिंदे, ऋषिकेश कांबळे, गणेश शिंदे, श्रेयश कांबळे, समर्थ शिंदे, रुद्र कांबळे, रोहित कांबळे, अर्जुन धनवाल, सक्षम कुचेकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या आंदोलनामुळे मार्केटयार्ड परिसरातील झाड कत्तलीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# मागासवर्गीयांना खुल्या प्रवर्गातून वगळण्याचा निर्णय मनुवादी

## संविधान संरक्षण समितीचा सरकारला इशारा

जन सम्राट टाईम्स

**धुळे :** राज्य सरकारकडून मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील संधींपासून वंचित ठेवण्याच्या प्रस्तावित निर्णयाविरोधात आता राज्यभर संतापाची लाट उसळू लागली आहे. धुळ्यात संविधान संरक्षण समितीच्या वतीने या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवत सरकारवर मनुवादी विचारसरणीचा आरोप करण्यात आला असून, निर्णय तात्काळ मागे न घेतल्यास महाराष्ट्रभर व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे. संविधान संरक्षण समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब हरिश्चंद्र लोंढे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने घेतलेला निर्णय हा पूर्णपणे असंविधानिक असून भारतीय संविधानातील समानता, सामाजिक न्याय आणि गुणवत्तेच्या तत्त्वांवर घाला घालणारा आहे. गुणवत्तेच्या आधारावर पात्र ठरणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून वगळण्याचा प्रयत्न म्हणजे संविधानिक हक्क हिरावून घेण्याचा प्रकार असल्याचा आरोप समितीने केला. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सरकारवर मनुवादी मानसिकतेने प्रेरित निर्णय घेतल्याचा गंभीर आरोप करत म्हटले की, "देशातील मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय समाजाची लोकसंख्या सुमारे ८५ टक्के असताना त्यांना केवळ ५० टक्के आरक्षण दिले जाते. तर उर्वरित खुला प्रवर्ग मोजक्या समाजासाठी राखून ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. अशा परिस्थितीत गुणवंत मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या



प्रवर्गातून वगळणे म्हणजे सामाजिक अन्याय अधिक तीव्र करणे होय." "शूद्र-अतिशूद्र समाजाला त्यांच्या मर्यादित प्रवर्गातच अडकवून ठेवणे आणि त्यांची गुणवत्ता असूनही खुल्या स्पर्धेत संधी नाकारणे ही मनुवादी वृत्तीची जाहीर अभिव्यक्ती आहे," असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. संविधानातील कलम १४ आणि १६ नुसार समान संधीचा अधिकार प्रत्येक नागरिकाला असल्याचे समितीने अधोरेखित केले.

### यावेळी अनेक कार्यकर्ते उपस्थित


मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गात समाविष्ट करणे हा त्यांचा घटनात्मक हक्क असून सरकारने "प्रवर्गासह खुला प्रवर्ग" हा पर्याय तातडीने लागू करावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात संविधान संरक्षण समितीचे संस्थापक तथा अध्यक्ष अण्णासाहेब हरिश्चंद्र लोंढे, प्राचार्य बाबा हातेकर, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी पंडीत गोसावी, बबन वानखेडे, दिपकुमार साळवे, महेंद्र पाटील, मनोहर मोहिते, पंडितराव बेडसे, भगवान वाघ, कॉ. पोपटराव चौधरी, श्रीकृष्ण बेडसे, विजय भामरे, छोटूभाऊ मोरे, धनंजय गाळणकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापौर रवी लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी

## विशेष पोलीस संरक्षणाच्या मागणीने खळबळ

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना समोर आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. समाधान हेल्पलाईनवर फोन करून अज्ञात व्यक्तीकडून धमकी देण्यात आल्याची माहिती समोर आली असून, या पार्श्वभूमीवर महापौरांना तातडीने विशेष पोलीस सुरक्षा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवत



महापौरांच्या सुरक्षेबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. धमकी देणारी व्यक्ती मानसिक संतुलन बिघडलेल्या अवस्थेत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असले तरी कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महापौर रवी लांडगे हे शहरातील विविध नागरी प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने नागरिकांमध्ये फिरत असून पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूक, अतिक्रमण, स्वच्छता आणि विकासकामांबाबत प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनावर दबाव आणत असल्याने त्यांना अनेक संवेदनशील प्रश्नांना सामोरे जावे लागत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. "महापौर हे शहरातील एक महत्त्वाचे घटनात्मक पद आहे. शहरातील लाखो नागरिकांच्या प्रश्नांसाठी ते दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड होऊ नये. तातडीने विशेष पोलीस संरक्षण देऊन प्रशासनाने जबाबदारी पार पाडावी," अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे. दरम्यान, धमकीच्या फोननंतर पोलीस प्रशासन सतर्क झाले असून संबंधित कॉलचा तपास सुरू करण्यात आला आहे. सायबर आणि तांत्रिक पथकाच्या मदतीने फोन करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या घटनेमुळे शहरातील राजकीय वर्तुळातही चर्चांना उधाण आले आहे.

# प्रवासात महिलेचे दागिने व रोख रक्कम लंपास!

जन सम्राट टाईम्स

**रावेर | प्रतिनिधी :** मध्य प्रदेशातून रावेरकडे प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या बॅगेतील तब्बल ३ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून रावेर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील सोनखेडी, ता. छनेरा येथील आरती नंदलाल चव्हाण या महिला १६ मे रोजी रेल्वेने रावेरकडे येण्यासाठी निघाल्या होत्या. प्रवासादरम्यान त्या रावेर रेल्वे स्थानकावर उतरून बसस्थानकाकडे गेल्या. यावेळी त्यांनी आपल्या बॅगेची तपासणी केली असता धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अज्ञात चोरट्यांनी बॅगेची साईडची चेन उघडून बॅग फाडत त्यातील रोकड व दागिन्यांवर हात साफ केला होता. चोरीस गेलेल्या ऐवजात १ लाख ४५ हजार रुपये रोख रक्कम तसेच सुमारे २ लाख रुपये किमतीचे साडेबारा ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असल्याचे समोर आले आहे. यात सोन्याचे झुमके, टॉप्स आणि अंगठीचा समावेश आहे. या घटनेनंतर महिलेने तात्काळ पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. सुरुवातीला भुसावळ रेल्वे पोलिसांकडे शून्य क्रमांकाने गुन्हा नोंदविण्यात आला होता. त्यानंतर हा गुन्हा रावेर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला असून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, संबंधित महिला रावेर तालुक्यातील पाल येथे घर खरेदी करण्यासाठी येत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्यांनी मोठी रोख रक्कम आणि दागिने सोबत आणले होते. मात्र प्रवासादरम्यानच चोरट्यांनी संधी साधत त्यांना गंडा घातला. या घटनेमुळे रेल्वे व बसस्थानक परिसरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रवाशांनी आपला मौल्यवान ऐवज सांभाळून ठेवण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# NEET पेपर फुटी प्रकरणावर धुळ्यात युवासेनेचा संताप; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

## विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना फाशी द्या!

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** देशभरात खळबळ उडालेल्या NEET पेपर फुटी प्रकरणाच्या निषेधार्थ धुळे युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक झाली असून, लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या दोषींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.

युवासैनिकांनी केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्था 'एनटीए'विरोधात जोरदार घोषणाबाजी करत शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारावर संताप व्यक्त केला. "विद्यार्थ्यांच्या कष्टाचा बाजार मांडणाऱ्यांना फाशी द्या", "पेपरफुटी माफियांना संरक्षण देणारे कोण?", "प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे" अशा घोषणांनी




संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. आंदोलनामुळे काही काळ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यावेळी युवासेना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, देशभरातील लाखो विद्यार्थी दिवस-रात्र मेहनत करून वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करतात. अनेक पालक कर्ज काढून मुलांना कोचिंग क्लासेसला पाठवतात. मात्र, पेपरफुटीसारख्या गंभीर प्रकारांमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरले जात असून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासच डळमळीत झाला आहे. आंदोलनानंतर युवासेनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून प्रमुख मागण्या मांडल्या. यामध्ये NEET पेपर फुटी प्रकरणाची चौकशी फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना कठोर शिक्षा देणे, विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही यासाठी पारदर्शक फेरपरीक्षेचा निर्णय घेणे तसेच वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे 'एनटीए'ची सखोल चौकशी करून परीक्षा यंत्रणेची पुनर्रचना करणे या मागण्यांचा समावेश होता. "हा केवळ एका परीक्षेचा प्रश्न नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आणि पालकांच्या आयुष्यभराच्या कष्टाचा प्रश्न आहे. दोषींना शिक्षा होईपर्यंत युवासेना संघर्ष सुरू ठेवेल," असा इशारा युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. हे आंदोलन युवासेना जिल्हा युवाधिकारी कुणाल कानकाटे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख न्हणू परदेशी, निंबा मराठे, महानगर प्रमुख धीरज पाटील, अण्णा फुलपगारे, प्रशांत भामरे, जयेश फुलपगारे, दीपक जाधव, तरबेज शेख, गोपी चव्हाण, जयेश नाईक, गोलू मुर्तडक, आवी जोंधळे, प्रणित पाटील, प्रेम कानकाटे, तुषार शिंदे, वैभव कानकाटे, यश वराडे यांच्यासह मोठ्या संख्येने युवासैनिक उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# खुल्या प्रवर्गातून मागासवर्गीय उमेदवारांना वगळण्याच्या प्रस्तावाला स्थगिती

## मंत्रिमंडळ बैठकीत तीव्र चर्चा; भुजबळ-राठोड यांनी नोंदवली हरकत, प्रकरण एजीकडे जाणार

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या खुल्या प्रवर्गातील पदांवर गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना समायोजित न करण्याच्या प्रस्तावित भूमिकेला अखेर तात्पुरती स्थगिती मिळाली आहे. मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत या विषयावर जोरदार चर्चा झाली असून काही मंत्र्यांनी तीव्र आक्षेप घेतल्याने संबंधित शासन निर्णय जारी करण्यात आलेला नाही. सदर प्रकरण आता महाधिवक्ता (एजी) यांच्याकडे कायदेशीर अभिप्रायासाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयीन सूत्रांनी दिली. राज्य शासनाच्या प्रस्तावित भूमिकेनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच इतर राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी वयोमर्यादा, पात्रता, प्रयत्न संख्या किंवा इतर घटनात्मक सवलतींचा लाभ घेतल्यास त्यांना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागांवर नियुक्ती देता येणार नाही, अशी भूमिका स्वीकारण्याचा विचार सुरू होता. या चर्चेमुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये, अधिकारी-कर्मचारी संघटनांमध्ये आणि सामाजिक संघटनांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.



मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या विषयावर चर्चा झाली असता मंत्री छगन भुजबळ आणि मंत्री संजय राठोड यांनी प्रस्तावावर स्पष्ट हरकत घेतल्याचे समजते. "खुला प्रवर्ग हा सर्वांसाठी खुला असतो. गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना केवळ त्यांच्या सामाजिक प्रवर्गाच्या आधारावर वगळणे हे संविधानातील समानतेच्या तत्त्वांच्या विरोधात ठरू शकते," असा मुद्दा बैठकीत मांडण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. या हरकतीनंतर शासन निर्णय तत्काळ निर्गमित करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रस्तावाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली असून शासन अंतिम भूमिका घेण्यापूर्वी कायदेशीर सल्ला घेणार आहे. दरम्यान, मंत्रालयीन अधिकारी मागासवर्गीय संघटनेने सोमवारी सात कॅबिनेट मंत्र्यांना निवेदन देत या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शविला होता. भारतीय संविधानातील कलम १४ आणि १६ अंतर्गत समानतेचा अधिकार व सार्वजनिक नोकरीतील समान संधीचा उल्लेख करत संघटनेने हा प्रस्ताव संविधानविरोधी असल्याचा दावा केला. संघटनेच्या प्रतिनिधींनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचाही आधार दिला. विशेषतः "सौरव यादव व इतर विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य" (2021) या प्रकरणाचा उल्लेख करत, गुणवत्तेनुसार निवड झालेल्या राखीव प्रवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागांवर समायोजित करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे मान्य केल्याचे सांगण्यात आले. संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. संदेश वाघ यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले आहे की, वयोमर्यादा सवलत, शुल्क सवलत किंवा तत्सम घटनात्मक सवलती या उमेदवारांना स्पर्धा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी दिल्या जातात. अशा सवलतींचा लाभ घेतल्यामुळे गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून वगळणे हे भेदभावपूर्ण ठरते. "खुला प्रवर्ग हा कोणत्याही विशिष्ट जातीसाठी राखीव नसून तो गुणवत्तेनुसार सर्वांसाठी खुला आहे," असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्याचे संघटनेने नमूद केले.

# बोदवडमध्ये तरुणाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** बोदवड शहरात एका तरुणाची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. किरकोळ वादातून घडलेल्या या हत्येमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अन्सार पिंजारी असे मृत तरुणाचे नाव असून, या प्रकरणातील संशयित आरोपी अरबाज शाह हा घटनेनंतर फरार झाला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मयत अन्सार पिंजारी आणि संशयित आरोपी अरबाज शाह हे एकमेकांच्या परिचयातील होते. काही दिवसांपूर्वी अन्सार यांच्या घरात चोरीची घटना घडली होती. या चोरीमागे अरबाज शाह याचा हात असल्याचा संशय अन्सारने व्यक्त केला होता. याच कारणावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता. आपल्यावर चोरीचा संशय घेतल्याचा राग मनात धरून आरोपी अरबाज शाह याने अन्सारविरुद्ध सूडाची भावना बाळगल्याचे बोलले जात आहे. गुरुवारी झालेल्या वादानंतर आरोपीने संतापाच्या भरात अन्सारवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात अन्सार गंभीर जखमी झाला आणि रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. गंभीर दुखापतीमुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बोदवड पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.